सकाळ

# शिक्षण हे अधिकार मिळविण्याचे साधन

## न्यायाधीश अनिरुद्ध टिकले; सोनईच्या महाविद्यालयात विधी शिबिर

**नेवासे, ता. ९ :** "शिक्षणामुळे महिलांना अनेक क्षेत्रांत कर्तबगारी दाखविण्याची संधी मिळाली आहे. विद्यार्थिनींनो, शिक्षण हे तुमचे साध्य नाही, तर ते तुमचा अधिकार मिळविण्याचे साधन आहे. महिलांना सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय या चार क्षेत्रांत निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार मिळाले, तरच त्यांना स्वातंत्र्य मिळाले असे म्हणता येईल," असे मत जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश अनिरुद्ध टिकले यांनी व्यक्त केले.

सोनई येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विधी सेवा समिती, नेवासे वकील संघ व मुळा एज्युकेशन सोसायटीतर्फे महिला दिनानिमित्त झालेल्या विधी शिबिरात




**सोनई : विधी शिबिरात बोलताना जिल्हा सत्र न्यायाधीश अनिरुद्ध टिकले. समवेत न्या. मृणालिनी डोईफोडे, न्या. अलका निवारे, न्या. बाळासाहेब चौधरी, न्या. अभिजित पाचरणे, उत्तम लोंढे, डॉ. विनायक देशमुख, डॉ. शंकर लावरे आदी. (छायाचित्र : सुनील गर्जे)**

न्यायाधीश टिकले बोलत होत. सहदिवाणी न्या. मृणालिनी डोईफोडे, न्या. बाळासाहेब चौधरी, न्या. अलका निवारे, न्या. अभिजित पाचरणे, सहायक पोलिस निरीक्षक कैलाश देशमाने, 'मुळा'चे सचिव उत्तमराव लोंढे, सहसचिव डॉ. विनायक देशमुख, प्राचार्य डॉ. शंकर लावरे, समन्वयक प्रा. ज्ञानदेव झिने उपस्थित होते.

न्या. चौधरी म्हणाले, "कायदा पाळण्यासाठी असतो, टाळण्यासाठी नाही. दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी कायदेमंडळ वेगवेगळे कायदे करीत आहे व त्याची अंमलबजावणी कार्यक्षमपणे होत आहे, हीसुद्धा सकारात्मक बाब आहे."

न्या. डोईफोडे म्हणाल्या, "महाविद्यालयात रॅगिंग करणे गुन्हा आहे व त्यामुळे उर्वरित आयुष्य बरबाद होऊ शकते. विद्यार्थ्यांनी रॅगिंगपासून दूर राहावे."

ॲड. मयूर वाखुरे यांनी प्रास्ताविक केले. ॲड. काकासाहेब गायके, ॲड. कारभारी वाखुरे, ॲड. वसंत नवले, ॲड. अनंत दरंदले, ॲड. प्रशांत माकोणे, उपप्राचार्य डॉ. अशोक तुवर, उपप्राचार्य शशिकांत लिपाने उपस्थित होते. प्रा. डॉ. संदीप खेडकर यांनी आभार मानले.

Nagar, NagarNorth
10/03/2019 Page No. 4

पुढारी

# महिलांना कर्तबगारी दाखवण्याची संधी : न्या. टिकले

**नेवासा : प्रतिनिधी**

सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय या क्षेत्रात निर्णय घेण्याचे महिलांना पूर्ण अधिकार मिळाले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने महिलांना स्वातंत्र्य मिळेल. शिक्षणामुळे महिलांना अनेक क्षेत्रात कर्तबगारी दाखवण्याची संधी मिळाली आहे. विद्यार्थिनींनो शिक्षण हे तुमचे साध्य नाही तर ते तुमचा अधिकार मिळवण्याचे साधन आहे, असे प्रतिपादन नेवासा येथील जिल्हा व अति. सत्र न्यायाधीश अनिरुद्ध टिकले यांनी केले.




जागतिक महिला दिनानिमित्त सोनई येथील महाविद्यालयात विधी सेवा समिती, नेवासा वकील संघ व मुळा एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विधी शिबिरात विद्यार्थिनींना मार्गदर्शन करतांना अध्यक्षपदावरून न्या. टिकले बोलत होते.

व्यासपीठावर सह दिवाणी न्यायाधीश मृणालिनी डोईफोडे, न्या. बाळासाहेब चौधरी, न्या. अलका निवारे, न्या. अभिजीत पाचरणे, सहाय्यक पोलिस निरीक्षक कैलास देशमाने, मुळाचे सचिव उत्तम लोंढे, सहसचिव डॉ. विनायक देशमुख, प्राचार्य डॉ. शंकर लावरे, डॉ. ज्ञानदेव झिने उपस्थित होते.

यावेळी न्या. बाळासाहेब चौधरी यांनी महिलांचे संपत्ती विषयक कायदे, न्या. मृणालिनी डोईफोडे यांनी रॅगिंग, न्या. अलका निवारे यांनी शेतकऱ्यांच्या समस्या व आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना, प्रा. डॉ. श्वेता चौधरी यांनी महिलांचे आरोग्य तर श्वेता देवरे या विद्यार्थिनीने बेटी बचाओ, बेटी पढाओ या विषयांवर उपस्थित विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन ॲड. एम. के. वाखुरे यांनी केले. यावेळी नेवासा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. वसंत नवले, ॲड. काकासाहेब गायके, ॲड. के. एच. वाखुरे, ॲड. पारस नहार, ॲड. अनिल आगळे, ॲड. अनंत दरंदले, ॲड. प्रशांत माकोणे, उपप्राचार्य शशिकांत लिपाने, प्रा. सुरेश जाधव उपस्थित होते.

My Ahmednagar Edition
10 Mar, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com